Literacy for a Billion

Movie: Sundar Majhe Ghar
Year: 2009

Song: Pachuchya Ranat Zimmad
Lyricist: Guru Thakur

पाचूच्या रानात झिम्मड पाऊस
पाचूच्या रानात झिम्मड पाऊस
उनाड अल्लड वारा
नारळी पोफळी शिरल्या आभाळी
वाळूत चांदणंचुरा
वाळूत चांदणंचुरा
पाचूच्या रानात झिम्मड पाऊस

पिवळी पिवळी बिट्ट्याची काचोळी
नेसल्या डोंगर वाटा
माळून गजरे फेसाचे साजिरे
सजल्या सागर लाटा
इथल्या रानात इथल्या रानात
तसाच मनात झरतो मायेचा झरा
नारळी पोफळी शिरल्या आभाळी
वाळूत चांदणंचुरा
वाळूत चांदणंचुरा
पाचूच्या रानात झिम्मड पाऊस

आंब्याला मोहोर बकुळी बहर
कहर चाफा फुले
माडाच्या सांदीला झाडाच्या फांदीला
इवला खोपा झुले
बोलतो कोकिळ त्याच्या गं मंजुळ
तोंडाला नाही थारा
तोंडाला नाही थारा
पाचूच्या रानात झिम्मड पाऊस

गंधीत धुंदीत सायली चमेली
लाजरी लाजेची कोर
गंधीत धुंदीत सायली चमेली
लाजरी लाजेची कोर
पळस पांगारा पिंपळ पसारा
जिवाला लावतो घोर
पळस पांगारा पिंपळ पसारा
जिवाला लावतो घोर
घंटेचा निनाद घंटेचा निनाद
घालुनिया साद सांगतो
जा पोरी घरा
नारळी पोफळी शिरल्या आभाळी
वाळूत चांदणंचुरा
वाळूत चांदणंचुरा
पाचूच्या रानात झिम्मड पाऊस

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*